d3

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला

## माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम प्रवेश सुचना

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला कार्यक्षेत्र अंतर्गत सन २०२५-२६ एक वर्ष माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया प्रवेशाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

- अभ्यासक्रम प्रवेश पात्रता

| अ. क्र. | अभ्यासक्रम | कालावधी | पात्रता |
|---|---|---|---|
| १. | माळी प्रशिक्षण (मराठी माध्यम) | १ वर्ष | ९ वा वर्ग उत्तीर्ण |

- माळी प्रशिक्षण केंद्र व प्रवेश क्षमता

| अ. क्र. | माळी प्रशिक्षण केंद्र | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १. | माळी प्रशिक्षण केंद्र (अकोला/नागपूर/काटोल/अचलपूर) | २५ (प्रत्येक केंद्रावर) |

टीप: सर्व माळी प्रशिक्षण केंद्रामध्ये रुपये २५०० प्रति प्रशिक्षणार्थी, प्रती महिना विद्यावेतन (Stipend) देण्यात येईल.

माळी प्रशिक्षण अभ्यासक्रमकरिता प्रभारी अधिकारी, माळी प्रशिक्षण केंद्र, उद्यान विद्या महाविद्यालय, अकोला माळी प्रशिक्षण केंद्र, कृषि महाविद्यालय, नागपुर, माळी प्रशिक्षण केंद्र, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, काटोल व माळी प्रशिक्षण केंद्र, कृषि संशोधन केंद्र, अचलपुर येथे प्रत्येक केद्रावर २५ जागा गुणवत्तेनुसार व माहितीपत्रकातील वर्गवारीनुसार अर्ज मागविण्यात येत आहे.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रियेची संपूर्ण माहिती, माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला च्या http:www.pdkv.ac.in या संकेतस्थळावर दिनांक ०२/०६/२०२५ पासून उपलब्ध करून देण्यात येईल. प्रवेशाकरिता उमेदवाराचे दिनांक ०१/०७/२०२५ रोजी वय १४ ते ४० वर्ष असणे आवश्यक आहे. विहित नमुन्यातील संपूर्ण भरलेले प्रवेश अर्ज (प्रवेश अर्ज शुल्क रु. १००/- शंभर रुपये सह) माळी प्रशिक्षण कार्यालयास दिनांक ०१/०७/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील याची नोंद घ्यावी.

कुलसचिव
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला